# Shrikrishna Education Societies

# SHRIKRISHNA MAHAVIDYALAYA, GUNJOTI

## NSS REPORT 2019-20

For the academic year 2019-20, several programs were organized and activities done by the National Service Scheme Department Shrikrishna Mahavidyala Gunjoti.

- On 14th June 2019, Blood donation camp was organized in association with Shrikrishna Blood Bank, Omerga. Also a program and awareness rally was organized on the same day.

- On the occasion of national yoga day, on 21st June a yoga camp was organized in college campus. All the teaching, non-teaching faculty members and students were present in the college campus on morning session. A Yoga instructor gives information and benefits of yoga to human life. He exercises several yoga positions and pranayama kriyas with participants.

- On 11th July 2019, on the occasion of World No Tobaco day, an Oath was taken by students, faculties and non-teaching members of the college.

- On the occasion of NSS day, on 24th September NSS department and Department of Lifelong learning and Extension jointly organize the health awareness workshop. In this workshop, Dr. Shubhangi Mahajan acts as President of the program and Dr. Ambika Patange and Dr. Dilip Kulkarni were present as guest. The workshop mainly focuses on skin dieses and hygiene.

- Between the dates, 24.12.2019 to 30.12.2019, a one week special camp of NSS students was organized at Murali, Tq. Omerga Dist. Osmanabad. Several activities were conducted and implemented by the NSS volunteers within the seven days special camp. The activities were Health checkup, Voter awareness, No Tobacco Campaign, HIV awareness, Water conservation, Cultural activities and cleaning campaign. Nearly 150 student volunteers were participates in the camp.






**Blood Donation Camp**





International Yoga Day

सकाळ



उमरगा : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थी शपथ घेताना.

# जागतिक तंबाखूमुक्त दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**उस्मानाबाद, ता. १४ : शहरासह जिल्ह्यात विविध ठिकाणी जागतिक तंबाखूमुक्त दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आले.**

**रा. गे. शिंदे महाविद्यालयात कार्यक्रम**

**परंडा** : येथील शिक्षणमहर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालयात गुरुवारी (ता. ११) जागतिक तंबाखूमुक्त दिन साजरा करण्यात आला.

सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, उपजिल्हा रुग्णालय आणि प्राणिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला. प्रभारी प्राचार्य डॉ. महेशकुमार माने अध्यक्षस्थानी होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद मोरे, डॉ. दीपक पेठे, समुपदेशक मकरंद वांबुरकर, तानाजी गुंजाळ, बळीराम तांबे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. शहाजी चंदनशिवे, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. एस. के. गायकवाड उपस्थित होते. रासेयोचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सचिन चव्हाण, प्रा. सचिन साबळे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. चंदनशिवे, प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अतुल हुंबे, नॅक विभागप्रमुख प्रा. विद्याधर नलवडे, वनस्पती विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश सरवदे, अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अरुण खर्डे, हिंदी विभागाचे प्रा. डॉ. बाळासाहेब राऊत आदी उपस्थित होते. तानाजी गुंजाळ यांनी तंबाखूमुक्तीसंदर्भात विद्यार्थ्यांना शपथ दिली. प्रा. डॉ. सचिन चव्हाण यांनी आभार मानले.

**शिवाजी महाविद्यालयात कार्यक्रम**

**उमरगा** : शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात गुरुवारी (ता. ११) कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी मार्गदर्शन केले. तंबाखूमुक्त अभियानाअंतर्गत तंबाखूजन्य पदार्थांची सेवा सोडण्याची शपथ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह जवळपास तीन हजार शंभर विद्यार्थ्यांनी घेतली. 'रासेयो'चे कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी या वेळी हेल्थ फाउंडेशनमार्फत प्रकाशित केलेल्या शपथपत्राचे सामुदायिक प्रकट वाचन केले. या वेळी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य संजय अस्वले, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी. तडोळगे आदी उपस्थित होते.



परंडा : येथील रा. गे. शिंदे महाविद्यालयात जागतिक तंबाखूमुक्त दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. आनंद मोरे.



गुंजोटी (ता. उमरगा) : श्रीकृष्ण महाविद्यालयात तंबाखूविरोधी दिनानिमित्त शपथ घेताना विद्यार्थ्यांसह कर्मचारी.

**जागतिक लोकसंख्या दिनाचा कार्यक्रम**

**गुंजोटी** : येथील श्रीकृष्ण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व भूगोल विभागाच्या वतीने जागतिक लोकसंख्या दिन व तंबाखू विरोधी दिनानिमित्त गुरुवारी (ता. ११) कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. मुरूम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्रा. डॉ. विलास खडके, भूगोल विभागप्रमुख डॉ. मिलिंद सूर्यवंशी, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. रामदास कोळी, प्रा. डॉ. किशन लोहार, डॉ. दस्तगीर पठाण, प्रा. प्रमोद चौधरी, प्रा. डॉ. दिगंबर चव्हाण, प्रा. डॉ. असिया चिश्ती, प्रा. योगिराज विजापुरे, प्रा. डॉ. कल्याण कदम, प्रा. हणमंत देशमुख, प्रा. बालाजी बोटेवाड यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला.

Aurangabad, Osmanabad-Today
15/07/2019 Page No. 3

**World No Tobaco Day**

सकाळ

# आरोग्याची निगा राखण्यासाठी सतर्कता घ्यावी : डॉ. चाकोते

**गुंजोटी, ता. २४ (बातमीदार) :** त्वचा काळवंडणे, घामोळ्या येणे, खाज, तसेच काळे चट्टे येणे आदी समस्या अनेकींना भेडसावत आहेत. अशा त्रासामुळे न खचता मुलींनी तज्ज्ञांच्या सल्ल्याने आरोग्याची निगा राखावी, असे आवाहन सोलापूरच्या त्वचारोग तज्ज्ञ डॉ. स्मिता चाकोते यांनी केले.

येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त एकदिवसीय आरोग्यविषयक मार्गदर्शन कार्यशाळा मंगळवारी (ता. २४) घेण्यात आली. त्यावेळी त्या बोलत होत्या. डॉ. शुभांगिनी महाजन अध्यक्षस्थानी होत्या. डॉ. अंबिका पतंगे, प्राचार्य डॉ. दिलीप कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

पाहुण्यांचा परिचय प्रा. सोनाली होटगे यांनी करून दिला. डॉ. चाकोते यांनी पॉवर पॉइंटने सादरीकरण करीत जीवन आनंददायी कसे जगावे, त्यांच्या आलेल्या वैद्यकीय सेवेच्या अनुभवातून सविस्तर मार्गदर्शन केले. प्रा. विनश्री गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. नुरीन सिद्दिकी यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. असिया चिश्ती, राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. रमेश पात्रे, प्रा. रामदास कोळी, प्रा. डॉ. कल्याण कदम, मोती जेटीथोर आदींनी पुढाकार घेतला. या वेळी मोठ्या संख्येने मुली उपस्थित होत्या.



**गुंजोटी (ता. उमरगा) : श्रीकृष्ण महाविद्यालयात आयोजित महिला आरोग्यविषयक कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. स्मिता चाकोते, डॉ. शुभांगिनी महाजन, प्राचार्य डॉ. दिलीप कुलकर्णी, डॉ. असिया चिश्ती आदी.**

Aurangabad, Osmanabad-Today
25/09/2019 Page No. 3

## Workshop on Health Awareness

समारोप समारंभ

दिनांक ३०/१२/२०१९ वार सोमवार सायं. २ वा.

अध्यक्ष : डॉ. दिलीप कुलकर्णी (प्राचार्य, श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी)

प्र. पाहुणे : डॉ. हरिदास हेंरे (प्राचार्य, वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी)

प्र. उपस्थिती : श्री. जमादार शमशेदीन घुडूलाल (सरपंच, मुरळी)
श्री. सुर्यवंशी आनंद अशोकराव (उपसरपंच, मुरळी)
सौ. कांबळे नयनाबाई सत्यवान (ग्रा.पं. सदस्या, मुरळी)
श्री. बिराजदार माधवराव सदाशिव (ग्रा.पं. सदस्य, मुरळी)
श्री. सरवदे तानाबाई विनोद (ग्रा.पं. सदस्या, मुरळी)
सौ. बिराजदार सोनाबाई विनोद (ग्रा. पं. सदस्या, मुरळी)
सौ. मोजनीदार बानुबी जहांगीर(ग्रा. पं. सदस्या, मुरळी)
श्री. पटेल रशिदखाँ उस्मानखान (तंटामुक्ती अध्यक्ष, मुरळी)
श्री. सरवदे अरूण (उपाध्यक्ष तंटामुक्ती, मुरळी)
श्री. देडे भरत नामदेव (अध्यक्ष शालेय समिती, मुरळी)
श्री. मोजनीदार शफीक महेमूद (उपाध्यक्ष शालेय समिती, मुरळी)
श्री. पटेल इमरान असदखाँ (उपाध्यक्ष शालेय समिती,मुरळी)
श्री. बिराजदार विनोद आण्णाराव (माजी उपसरपंच,मुरळी)
श्री. चंडरगिरी (तलाठी ग्रा.पं.,मुरळी)
श्री. बलसूरे एस. व्ही. (ग्रामसेवक ग्रा.पं.,मुरळी)

◆ शिबीर दिनक्रम ◆

* स. ५ ते ७ योग, प्राणायाम व कवायती * स. ७ ते ८ अल्पोपहार * स. ८ ते १ श्रमदान
* दु. १ ते २ स्नान व भोजन * दु. २ ते ३ विश्रांती * दु. ३ ते ५ बौद्धिक व्याख्यान
* सायं. ५ ते ६ मनोरंजनात्मक खेळ * सायं. ७ ते ९ सांस्कृतीक कार्यक्रम * रात्री ९ ते १० भोजन

◆ शिबीरातील कामे ◆

आरोग्य तपासणी, मतदार जागृती, तंबाखू मुक्त अभियान, एड्स जनजागृती, जलसंधारणाची कामे, रक्तदान, आरोग्य तपासणी, सांस्कृतीक प्रबोधनपर कार्यक्रम इ.

उद्घाटन, समारोप व इतर सर्व कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर प्रशासकीय कर्मचारी व ग्रामस्थ यांची उपस्थिती प्रार्थनीय आहे.

बुक-पोस्ट

मा.श्री./सौ ______________________

______________________

प्राचार्य
श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी ता. उमरगा
फोन : (०२४७५) २५००९१

॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

श्रीकृष्ण शिक्षण संस्था संचलित

**श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी**

Dr. B.A.M.U. A'bad.

ता. उमरगा, जि. उस्मानाबाद.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**राष्ट्रीय सेवा योजना**

विशेष शिबीर २०१९-२०२०

'स्वच्छ ग्राम व जलसंवर्धन'

**निमंत्रण व कार्यक्रम पत्रिका**

मौजे मुरळी ता. उमरगा (दि. २४/१२/२०१९ ते ३०/१२/२०१९)

सुवर्ण महोत्सवी वर्ष

National Service Scheme

150 YEARS OF CELEBRATING THE MAHATMA

Not Me But You

● मार्गदर्शन ●

डॉ.टी.आर.पाटील
डॉ. सुर्यकांत आगलावे

● सल्लागार समिती ●

| | | |
|---|---|---|
| डॉ. के. एस. लोहार | डॉ. जी. एम. राठोड | डॉ. एम. सी. खोत |
| प्रा. आर. एन. निगडे | डॉ. डी. एम. पठाण | एस.व्ही. देशमुख<br>प्रशासकीय कर्मचारी |

● आपले नम्र ●

प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी

कार्यक्रम अधिकारी

प्रा. आर. जी. कोळी    डॉ. आर. डी. पात्रे    डॉ. एम. जी. अंबुसे

विद्यार्थी प्रतिनिधी

स्वप्नील माने    कु. स्नेहल कोनाळे

सर्व शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी व समस्त ग्रामस्थ, मुरळी
मा. मुख्याध्यापक व सर्व शिक्षक, मुरळी

## NSS Camp Invitation Card

लोकमत

**ज्ञानराज चौगुले : श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास मुरळी येथे प्रारंभ**

# पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे व्यवस्थापन व्हावे...

लोकमत न्यूज नेटवर्क

गुंजोटी : पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे योग्य व्यवस्थापन केल्यास पाण्याची कमतरता भासणार नाही, असे मत उमरगा-लोहाराचे आमदार ज्ञानराज चौगुले यांनी व्यक्त केले.

गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे मुरळी येथे आयोजित 'स्वच्छ ग्राम व जलसंवर्धन' या विशेष शिबिराचे उद्घाटन आमदार चौगुले यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे अध्यक्षस्थानी होते. संस्था उपाध्यक्ष प्रभाकरराव हिरवे, संचालक राजशेखर माळगे, मुरळी गावचे सरपंच शमशोद्दीन जमादार, उपसरपंच आनंद सूर्यवंशी, तंटामुक्त अध्यक्ष पटेल राशीदखाँ, शालेय समितीचे अध्यक्ष भरत देडे, उपाध्यक्ष पटेल इम्रान, प्राचार्य डॉ. दिलीप कुलकर्णी, ग्रामपंचायत सदस्या नयनाबाई कांबळे, सोनाबाई बिराजदार, बानूबी मोजनीदार, तानाबाई सरवदे, विनोद बिराजदार, कार्यक्रमाधिकारी डॉ. रमेश पात्रे, प्रा. रामदास कोळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार चौगुले म्हणाले, घराचे नवीन बांधकाम करताना पावसाच्या पाण्याच्या साठवणकरिता योग्य नियोजन करावे. तसेच राष्ट्रीय सेवा योजना आणि उन्नत भारत अभियान यांच्यामार्फत गावात ग्रामस्थांनी बंधारे, ग्राम स्वच्छता होण्यास सहकार्य करावे असे आवाहन केले.

याप्रसंगी डॉ. दामोदर पतंगे, सरपंच शमशोद्दीन जमादार यांचीही भाषणे झाली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांनी केले. सकाळी योग, प्राणायाम व कवायती, शोषखड्डे ग्रामस्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, जलसंधारणाची कामे, रक्तदान, महिलांची हिमोग्लोबिन तपासणी, उन्नत भारत अभियानतर्फे सर्वेक्षण व जागृती, सेंद्रिय शेती काळाची गरज, आपत्ती व्यवस्थापन आदी उपक्रम २९ तारखेपर्यंत चालणार आहेत. या सर्व उपक्रमात मुरळीचे ग्रामस्थ सहभागी होणार आहेत. प्रा. राजेंद्र निगडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आर. डी. पात्रे यांनी आभार मानले.




गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने आयोजित शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना आ. ज्ञानराज चौगुले. व्यासपीठावर मान्यवर दिसत आहेत.

Hello Osmanabad
Page No. 3 Dec 27, 2019
Powered by: erelego.com

**NSS Camp News (Inauguration and First day activity)**




गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत महिला आरोग्य शिबिर दरम्यान तपासणी करताना डॉ. मीनाक्षी डिग्गीकर, डॉ. पतंगे, डॉ. मृणालिनी बटुकने आदी.

## 'रासेयो' शिबिरात महिला आरोग्य तपासणी

गुंजोटी : येथील श्रीकृष्ण महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे श्रमसंस्कार शिबीर मुरळी येथे होत आहे. या शिबिरात शनिवारी रक्तदान शिबीर, महिला आरोग्य तपासणी शिबीर व महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डॉ. अंबिका पतंगे, डॉ. मीनाक्षी डिग्गीकर, डॉ. मृणालिनी बटुकने, प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी गावातील महिला व महाविद्यालयीन मुलींची आरोग्य तपासणी करून मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरासाठी प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, रासेयोच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. जी. कोळी, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे, डॉ. ए. एम. चिस्ती, डॉ. कल्याण कदम, मंगल देसाई, भारतबाई चव्हाण यांच्यासह बचत गटाच्या महिला व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

**Health Checkup Camp News**





**Camp Inauguration Photo**






**Plastic Free campaign**




**NSS and Red Ribbon club activity**



**Regular Activity**









**Cleanliness activities during the camp**